● सोमवार, दि. ११ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १०७ वा ● किंमत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282







**विधानसभा निवडणुक २०२४ साठी निवडणूक आयोगाकडून मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे प्रयत्न सुरु असून त्या अनुषंगाने जिल्हा निवडणुक आयोगानेही जिल्ह्यात बॅनरबाजी करत मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले आहे. जालना शहर महानगर पलिकेकडून ठिकठिकाणच्या चौकात, दर्शनी भागात मी मतदान करणार या आशयाचे पेन्ट ने लिहून मतदारांना मतदान करण्यासाठी आकर्षित करण्यात येत आहे. (छाया/जावेद तंबोली)**

## मुख्यमंत्र्यांसाठीचे समोसे सुरक्षारक्षाकांनीच केले गायब!

**शिमला** - हिमाचल प्रदेशमध्ये मुख्यमंत्र्यांसाठी मागवण्यात आलेले समोसे गायब झाल्याच्या प्रकरणावरून राजकारण चांगलंच तापल्याचं दिसतंय. एका कार्यक्रमात मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांच्यासाठी मागवण्यात आलेले समोसे सुरक्षारक्षकांनी खाल्ले. नंतर हे प्रकरण एवढं वाढलं की त्याच्या सीआयडी तपासाचे आदेशही दिल्याची चर्चा आहे. या प्रकरणी गुप्त अहवालही देण्यात आल्याची माहिती समोर येतेय. तर दुसरीकडे विरोधी पक्षांनी काँग्रेस सरकारवर जोरदार हल्ला केल्याचे दिसते. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू हे २१ ऑक्टोबर रोजी सीआयडी मुख्यालयातील एका कार्यक्रमासाठी गेले होते. त्यांच्यसाठी लक्कड बाजारातील रेडिसन ब्लू हॉटेलमधून समोसे आणि तीन डबे जेवण ऑर्डर करण्यात आले होते. पण समन्वयाच्या अभावामुळे **पान २ वर**

युवा आदर्श

### निवडणूक ...

**खूप काही देते घेते**
**मजेदार निवडणूक**
**नेते भलते विदुषक**
**रोजनवी करमणूक**
**स्वता:च केला गुंता**
**करुपाहे सोडवणूक**
**साहेब येणार सभेत**
**सामान्यां अडवणूक**
**असे असावेत पुढारी**
**नेत्यांची करे वर्णणूक**
**युती आघाडी करता**
**अनिवार्य रे घाटणूक**
**खजिना केलाखाली**
**आश्वासन गुंतवणूक**
**जाणी सगळे दुर्भिक्ष**
**कुणी केली अटणूक**
**स्पष्टप्रश्न विचारताचं**
**कशीहोई अडचणूक**
**बोले केले खूपकाही**
**जनते  नसे अराणूक**
**मतदाराहाती सुकाणूं**
**मतदानां दिसो चुणूक**
**निकाला नंतर आराम**
**असह्यझाली दमणूक**


**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# साड्या अन् पर्स!

## महिनाभरापुर्वीच नारायण कुचेंची मतदारांना आकर्षित करण्याची योजना फसली... आता नव्याने पुन्हा प्रयत्न सुरु असल्याच्या चर्चा, निवडणुक आयोग बारकाईने लक्ष ठेवेल का?

**दीपक शेळके**

**जालना** - विधानसभा निवडणुका तोंडावर येत असतांना राजकीय पक्षांकडुन मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध युक्त्या लढविल्या जात होत्या यात प्रामुख्याने महायुतीची लाडकी बहिण योजनेचे कार्यक्रम चर्चे चा विषय होत होते. बदनापूर मतदार संघातही विविध गावात आ. नारायण कुचे यांच्याकडून लाडकी बहिण योजनेचे कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रम ादरम्यान आ. नारायण कुचे यांनी म हिलांना आकर्षित करण्यासाठी साड्या आणि पर्सचे वाटप केले होते. त्यावेळी वाकुळणी येथील ग्रामस्थांनी साड्या अन् पर्स पेटवून देत एक मराठा लाख मराठाच्या घोषणाही दिल्या होत्या. या घटनेला जवळपास २० ते २२ दिवस होत असतील, मागच्या महिन्यातील ही घटना आहे. निवडणुका केव्हांही घोषित होण्याची शक्यता असल्याने आ. नारायण कुचेंकडून एकप्रकारे लाच देण्याचा प्रयत्न त्यावेळी करण्यात आला म्हंटल्यास वावगे ठरणार नाही मात्र, त्यावेळी आचारसंहिता लागू नसल्याने नारायण कुचे यांचे भागले. आता सध्या आचारसंहिता सुरु आहे. असाच काहीसा प्रकार पुन्हा नारायण कुचे यांच्याकडून होण्याची शक्यता मतदार संघात व्यक्त होत आहे. त्यामुळे आता निवडणुक आयोग आ. नारायण कुचे यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवेल का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे. सध्यास्थितीत नारायण कुचे यांच्या बदनापूर येथील कार्यालयावर दारूचा महापूर येत आहे. जेवनावर ताव मारल्या जात आहे. रात्री उशिरापर्यंत म्हणजेचे दीड ते दोन वाजेपर्यंत या ठिकाणी पदाधिकारी- कार्यकर्त्यांचा राबता आहे. या कार्यालयाबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे सुद्धा लावलेले आहेत. त्यामुळे नेमके या ठिकाणी कोण आले किती वाजता आले आणि किती जण आले हे समजल्यास ते कशासाठी आले याचा देखील खुलासा होण्याची शक्यता आहे. मात्र, यासाठी निवडणुक आयोगाला ठोस पाऊले उचलावे लागतील.



विधानसभा निवडणुकीत सध्या रंगत येत असून बदनापूर मतदार संघात महायुती म्हणजेच भारतीय जनता पक्षाचे उमेदवार नारायण कुचे व महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) रुपकुमार (बबलू) चौधरी यांच्यात थेट लढत आहे. गेल्या तीन विधानसभा निवडणुकांपासून रुपकुमार (बबलू चौधरी) आपले नशिब या ठिकाणाहून आजमावत आहेत.



भाजपा-शिवसेना युती काळात हा मतदार संघ शिवसेनेकडे होत व शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जायचा. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे संतोष सांबरे या ठिकाणाहून निवडून आले होते. त्यानंतर झालेल्या पंचवार्षिक म्हणजेच २०१४ च्या निवडणुकीत युती भंगली आणि शिवसेना व भाजपाने आपआपले उमेदवार या ठिकाणी उतरवले होते. तेव्हा केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या आशिर्वादाने व नरेंद्र मोदी यांच्या लाटेत भाजपाचे नारायण कुचे हे १७ दिवसात आमदार झाले. आम दारकीची हवा कुचे यांच्या डोक्यात शिरली. मतदार संघातील गावागावात त्यांनी दानवे समर्थक व कुचे समर्थक अशी गटबाजी करत दोन गट निर्माण केले. याची प्रचिती ही २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पहायला मिळाली. मात्र, या निवडणुकीत शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष हे एकत्र लढले. २०१९ च्या लढतीत नारायण कुचे यांना शिवसेनेच्या सहकार्यामुळेच १ लाखांवर मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार बबलू चौधरी यांना ८६ हजारावंर मते मिळाली. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत भाजपा बरोबर असलेली उद्धव ठाकरेंची शिवसेना ही राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांच्यासोबत म हाविकास आघाडीचा घटक पक्ष आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील घटक पक्षांतील नेत्यांना गेल्या तीन विधानसभा निवडणुकीत पडलेल्या मतांचा विचार करता महाविकास आघाडीच वरचढ ठरणार हे नक्की असले तरी येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान असून त्या दिवशी या मतदार संघातील जनता कुणाच्या पारड्यात आपली मते टाकतात हे २३ नोव्हेंबर रोजी स्पष्ट होईल.

## भाजपाच्याजालना महानगर जिल्हा कार्यकारी अध्यक्षपदी सतीश जाधव यांची नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हा कार्यकारी अध्यक्षपदी सतीश सुरेशराव जाधव यांची नियुक्ती भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका नियुक्ती पत्राद्वारे केली आहे. माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या शिफारशीवरून ही नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी श्री. सतीश जाधव यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, आपल्या आतापर्यंतच्या पक्ष कार्याची दखल घेऊन भारतीय जनता पक्षाने आपणास जालना महानगर जिल्हा कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. आपण वेळोवेळी होणाऱ्या बैठका तसेच कार्यक्रमांना उपस्थित राहवे व संघटन वाढीसाठी आपले योगदान द्यावे असे म्हटले आहे.

यावेळी आ. संतोष दानवे, आ.नारायण कुचे, भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, भाजपा प्रदेश निमंत्रीत सदस्य रामेश्वर पाटील भांदरगे, राजेश राऊत, विजय कामड, विमलताई आगलावे, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे आदींनी या निवडीचे अभिनंदन केले आहे.



## भ्रष्ट कारभारामुळे ईडीची कारवाई ते कर्माचे फळ - गोरंट्याल

**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांच्या म ालकीचा साखर कारखाना लाटत्तांनाच जालना कृषी उत्पन्न बाजार समितीत केलेल्या कोटयावधी रुपयांच्या भ्रष्ट कारभारामुळेच माजी राज्यमंत्र्यांना ईडीच्या कारवाईला सामोरे जावे लागले असून हे आपण केलेल्या कर्माचे फळ असल्याची टीका इंडिया महाविकास आघाडीचे उम ेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी केली आहे.

जालना विधानसभा मतदार संघातील रामनगरसह अन्य गावांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या भव्य प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी खा.डॉ. कल्याण काळे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ, मुरलीधर थेटे, शिवाजीराव शेजुळ, राजेंद्र राख, विजय चौधरी, हरिहर शिंदे, गोपाल मोरे, राम शेजुळ, विष्णू पडूळ, दामोधर सोनवणे, युवराज राठोड, संदीप खरात, ज्ञानेश्वर डुकरे, अंजेभाऊ चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना गोरंटयाल म्हणाले की, आपण मागील पाच वर्षात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावतांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून आणले नाही तर ते कार्यान्वित देखील करून दाखवले. आज या शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाले असून भविष्यात जालना जिल्ह्यातील स्थानिक विद्यार्थ्याना त्याचा निश्चितपणे लाभ होणार आहे. रस्ते, सामाजिक सभागृह, गाव अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासह अनेक गावातील विकासाची कामे पूर्ण केली असून त्यामुळेच आपल्या मागे जनतेचे पाठबळ मिळत आहे. काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस सोबत आता उध्दव ठाकरे यांची शिवसेना सोबत असल्याने ग्रामीण भागात देखील आपल्याला भरीव मतदान मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करून गोरंटयाल यांनी आपले प्रतिस्पर्धी उमेदवार खोतकरांवर टीकेची तोफ डागली. ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या आणि सभासदांच्या मालकीचा असलेला कोटयावधी रुपये किमतीचा जालना साखर कारखाना हा खोतकर यांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून कवडीमोल भावात घेतला. त्यानंतर जालना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात जवळपास १ हजार गाळ्यांच्या माध्यमातून कोटयावधी रुपये उकळले आहेत. या कारणांमुळेच त्यांच्याम ागे ईडीच्या कारवाईचा ससेमिरा लागला आहे. चार वर्षांपूर्वी दीपावली पाडव्याच्या दिवशी जालना साखर कारखाना पुन्हा सुरू करण्याचे **पान २ वर**



## संपादकीय पान

# विशाल मनाचे व्यक्ती

आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो कारण आजच्याच दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी भारताचे पहिले शिक्षण मंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते. अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले. त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत. मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत. अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या ३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते. ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोर्ड्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २३ फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले. जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# अर्जुनराव खोतकर यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज जालन्यात जाहीर सभा

## आम्ही टक्केवारीवर लक्ष देत नाही कामावर देतो - खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व मित्र पक्षाचे लोकप्रिय अधिकृत उमेदवार अर्जुन पंडितराव खोतकर यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही जाहीर सभा उद्या म्हणजे सोमवारी ४.३० वाजता आझाद मैदान, जालना येथे होणार आहे, या सभेस महायुतील पदाधिकार्यांसह मतदार संघातील मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, जालना विधानसभा मतदार संघातील पीर कल्याण येथे अर्जुन खोतकर यांचे जंगी स्वागत करण्यात आले. श्री. खोतकर यांनी पीर कल्याण, बाजी उम्रद, कडवंची, धार येथेही भेटी देऊन मतदारांशी संवाद साधला.यावेळी श्री. खोतकर यांच्या समवेत श्री. पंडीतराव भुतेकर, भाऊसाहेब घुगे, संतोषराव मोहिते आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पीरकल्याण गावातील लोकांना आपल्या हक्काचा आणि अधिकाराचा व्यक्ती असल्यानें लोकांच्या चेहर्यावर आनंद व्यक्त होताना दिसत होता. यावेळी पीरकल्याण गावातील सर्व महापुरुषाच्या चरणी अभिवादन करून श्री. खोतकर यांनी लोकांशी संवाद साधण्यास सुरुवात केली.

याप्रसंगी चर्चा करताना श्री. खोतकर यांनी जालना विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाकरिता गेल्या अडीच वर्षात ३०० ते ४०० कोटी रुपयांचा निधी आणून शहर असेल किंवा ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. जालना विधानसभा मतदारसंघाचा भूमिपुत्र म्हणून मी नेहमीच आपल्या सेवेत रुजू आहे व कुठल्याही अडीअडचणी, सुख- दुःखात मी तुमच्या पाठीमागे तत्पर उभा असल्याचं मत यावेळी श्री. खोतकर यांनी व्यक्त करुन आपली ऊमेदवारी अनेकांना खटकू लागली आहे. त्याचे कारणही तसेच आहे. आम्ही केवळ टक्केवारीवर लक्ष देत नाही तर कामावर लक्ष असते. एकीकडे काम करणारा माणूस तर दुसरीकडे टक्केवारी घेऊन काम वाऱ्यावर सोडणारा आमदार, अशी अवस्था या मतदार संघाची आहे. म्हणूनच याच मतदार संघातील अनेक जण म्हणतात की, जालना विधानसभेचे एकच लक्ष, हवे फक्त अर्जुनभाऊ खोतकर! याप्रसंगी शिवसेना युवासेना, शिवसैनिक, तसेच भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जेष्ठ मंडळी, महिला भगिनी, ग्रामस्थ, युवा पिढी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





टीईटीची परीक्षे दरम्यान बायोमेट्रिक तपासणी करुन विद्यार्थ्यांना परिक्षा हॉलमध्ये सोडण्यात आले. (छायाचित्र किरण खानापुरे)

पान १ वरुन

### मुख्यमंत्र्यांसाठीचे समोसे ...

हे समोसे मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचलेच नाहीत. हे प्रकरण समोर आल्यानंतर त्याची पोलिस उपाधीक्षांकडून चौकशी करण्यात आल्याची माहिती आहे.

मुख्यमंत्र्यासाठी ऑर्डर करण्यात आलेले समोसे हे त्या ठिकाणच्या सुरक्षारक्षकांनी चुकून खाल्ल्याचं समोर आलं. त्यानंतर प्रोटोकॉल तोडल्याने तसेच सुरक्षारक्षकांनी केलेल्या गैरवर्तनामुळे या प्रकरणाची सीआयडी चौकशी करण्यात आल्याची माहिती आहे.

दरम्यान, विरोधी पक्षांनी या प्रकरणावरून सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे. विरोधी पक्षनेत्यांनी मुख्यमंत्र्यांसाठी एक डझन समोसे पाठवून या प्रकरणाता निषेध केला.

हिमाचल प्रदेश सीआयडीचे महासंचालक संजीव रंजन ओझा यांनी सांगितले की, २१ ऑक्टोबर रोजी सीआयडी मुख्यालयात मुख्यमंत्र्यांचा कार्यक्रम होता. सायबर क्राइम विंगच्या डेटा सेंटरचे उद्घाटन करण्यासाठी मुख्यमंत्री शिमल्यात आले होते. मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्र्यांसाठी अल्पोपाहाराची ऑर्डर देण्यात आली होती, मात्र ती मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचली नाही. कार्यक्रम संपल्यानंतर पोलीस अधिकारी चहा पीत बसले होते. यावेळी अल्पोपाहाराबाबत चर्चा झाली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांसाठी आदेश दिलेला अल्पोपाहार कुठे होता अशी विचारणा करण्यात आली.

याप्रकरणी चौकशीचे कोणतेही आदेश देण्यात आले नसल्याचे सीआयडीच्या प्रमुखांनी सांगितलं. मात्र सीआयडीला लेखी अहवाल प्राप्त झाला असून ही पूर्णपणे सीआयडीची अंतर्गत बाब असल्याचे त्यांनी सांगितले. सीआयडीचा व्हायरल होणारा अंतिम तपास अहवाल चिंतेचा विषय असल्याचे ते म्हणाले. एकाही कर्मचाऱ्याविरुद्ध नोटीस बजावली नसल्याचे त्यांनी सांगितले. या संपूर्ण प्रकरणात राजकारण करू नये, अशी विनंती त्यांनी केली आहे.

### भ्रष्ट कारभारामुळे ...

आश्वासन खोतकर यांनी रामनगर परिसरातील शेतकऱ्यांना दिले होते. काय झाले त्या आश्वासनाचे ? सुरू झाला का कारखाना असा प्रश्न गोरंटयाल यांनी उपस्थितांना विचारत कारखाना तर काही सुरू झाला नाही मात्र, त्यातील किमती असलेले साहित्य लांबवन्यात आल्याचे निदर्शनास आले. खोतकर यांनी नेहमीच आपले कुटुंब आणि काही मोजक्या नातेवाईकांच्या विकासाला प्राधान्य दिले असून पदाधिकारी, कार्यकर्त्यांना त्यांनी कधीही मोठे होऊ दिले नाही. दुसरीकडे आपण मात्र, मागील पाच वर्षात केवळ विकासाला प्राधान्य दिले असून भविष्यात आपल्याला मतदार संघाचे चित्र बदलायचे आहे. त्यामुळे यावेळी पुन्हा एकदा आपल्या पाठीशी उभे राहून भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन शेवटी उमेदवार कैलास गोरंटयाल यांनी केले. तत्पूर्वी खा. डॉ. कल्याण काळे यांनी आपल्या भाषणातून राज्यात महाविकास आघाडीची सत्ता येणार असल्याचे सांगून जालन्याचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांना यावेळी मंत्रिमंडळात स्थान मिळणार असल्याने त्यांना मोठया मताधिक्याने विजयी करून पुन्हा एकदा विधानसभेत पाठवा असे आवाहन खा. काळे यांनी केले. या सभेस रामनगरसह परिसरातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते हजारो शेतकरी, कामगार आणि ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# शेतकरी भावांनो, मतदान करून लोकशाही बळकट करा- मोरे

## ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या चर्चासत्रात आवाहन



**जालना । प्रतिनिधी -** प्रत्येक सज्ञान नागरिकाला भारतीय संविधानाने मतदान करण्याचा समान हक्क प्रदान केलेला आहे. प्रत्येकाने येत्या २० नोव्हेंबर रोजी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी शत प्रतिशत मतदान करून इतरांनाही मतदान करण्याबाबत जागृत करावे असे आवाहन ग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख संजय मोरे यांनी केले.

प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला होणारे ग्रोव्हिजन गटशेती संघांचे नोव्हेंबर महिन्याचे नियमित मासिक चर्चासत्र यावेळी जाफराबाद तालुक्यातील मौजे आंबेगाव येथील शेतशिवारात आयोजित करण्यात आले होते. यावेळी श्री. संजय मोरे पाटील यांनी हे आवाहन केले. त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मतदानाचे महत्त्व सांगून आपला आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रत्येकाने मतदान करावे, ते प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे. त्यातूनच बळकट लोकशाही निर्माण होण्यास मदत होते. मतदान करण्याबाबत इतरांनाही त्यांच्या या हक्काबाबत सांगावे. समाजात जागृती निर्माण करावी, असे आवाहनही श्री.संजय मोरे पाटील यांनी केले. यावेळी शिवार फेरीही करण्यात आली. वनप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला सर्वश्री भानुदासराव डोईफोडे, सुधीर जोशी, दत्तात्रय देठे, पंढरीनाथ देठे, ऋषिनाथ देठे, भगवान देठे, चंद्रकांत देठे, गुलाबराव देठे, गजानन चिडे, शिवाजी देठे आदींची उपस्थिती होती.



## जालना जिला मारवाड़ी महिला सम्मेलनतर्फे दिवाळी निमित्त
# साड्या, मिठाई व फरसाणचे वाटप



**जालना । प्रतिनिधी** - येथील जालना जिला अखिल भारतीय मारवाड़ी महिला सम्मेलन तर्फे जिलाध्यक्षा श्रीमति सावित्रीदेवी मल्लावत यांनी दिवाळीसणा निमित्त जूना मोंढा येथे आरोग्य सेविका, शिक्षिका व गरजूंना साड्या व मिठाई व फरसाण चे वाटप केले. त्या साठी दीपावली स्नेह सम्मेलन हा तीन तासाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्या साठी सावित्रीदेवी तर्फे ५० महिलांच्या अल्पाहार ची व्यवस्था करुन सर्वांना नाश्ता व चहापाणी देण्यात आले. प्रथम सर्वांचे स्वागत करुन सर्वांना शुभकामना देण्यात आल्या. त्यानंतर २५ महिलांना साड्या व मिठाई फरसाण ची पाकिटे श्रीमती सावित्रीदेवी मल्लावत यांनी दिली. यावेळी सर्वांनी एकमेकांना दीपावली च्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सर्वांना गरम नाश्ता व चहापाणी देण्यात आले. मारवाडी सम्मेलन च्या या कार्यक्रमा ला स्मिता चेचाणी तारा शर्मा नीता आर अग्रवाल इंदु निमोदीया रमा पित्ती प्रेमा अग्रवाल इंदु भारुका पुष्पा निमोदिया आशा कोठारी लीलाबाई निमोदिया ममता अग्रवाल राखी भंडारी राणी शर्मा पुजा अग्रवाल इत्यादि ४० मारवाड़ी सम्मेलन च्या सदस्यांची उपस्थिति होती.त्यानंतर आलेल्या पाहुण्यांना व सम्मेलन च्या सर्व सदस्यांना कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडल्या चे आभार प्रकट करुन निरोप देण्यात आला.

# एक रक्त पिशवी तीन जणांचे प्राण वाचवते -वाणी
## ब्राह्मण सभेत रविवारी रक्तदान शिबीर

**जालना । प्रतिनिधी** - ब्राह्मण सभा, रेडस्वस्तिक सोसायटी वपरिवर्तन असंघटित कामगार संघ,जालना एच. डी.एफ. सी.बँक यांच्या वतीने रविवारी रक्तदान शिबिर संपन्न झाले. यावेळी एच. डी एफ सी बँकेचे जितेंद्र वाणी यांनी रक्तदान किती महत्त्वाचे आहे याची माहिती दिली , यावेळी ते म्हणाले की जेंव्हा एक व्यक्ती रक्तदान करते त्यावेळी या दानामुळे तीन व्यक्तीचे प्राण वाचवले जाते. आयोजनकरण्यात आले आहे. या शिबिराचेउद्घाटन डॉ.जितेंद्र बारगजे यांच्या हस्ते संपन्न झाले अध्यक्ष म्हणून डॉ. रवींद्र देशमुख हे होते. यावेळी ३२ व्यक्तींनी रक्तदान केले. यावेळी अभिराम देशमुख,स्वाती देशमुख, दिनकर घेवंदे,राहुल रामदासी,मोहन शर्मा, आबा गाडीवान,शार्दुल भाले आदींनी रक्तदान केले, यावेळी दिव्यांग बळीराम तिडके यांनी रक्तदान केले.

या प्रसंगी कल्याणराव देशपांडे, रमेश देहेडकर, विजय दाड, शकील, जितेंद्र अग्रवाल,



पवन जोशी आर. आर. जोशी, सुनील जोशी, भगवान पुराणिक, रामनिवास गौड, अश्विनी वासडिकर आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. सुभाष भाले यांनी केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ.संजय रूईखेडकर, श्रीकांत शेलगावकर, रवींद्र देशपांडे, राहुल कुलकर्णी (HDFC), दिनकर घेवंदे यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) शेख खलील यांचा काँग्रेसमध्ये कार्यकर्त्यांसह प्रवेश

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील एका हॉटेलमध्ये आयोजित एका कार्यक्रमात महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थिती राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) शेख खलील यांचा काँग्रेसमध्ये कार्यकर्त्यांसह प्रवेश केला आहे. जालना विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारसभेदरम्यान हा प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी राज्यसभा सदस्य चंद्रकांत हंडोरे, पी.सी शर्मा, राजाभाऊ देशमुख, खा. डॉ. कल्याण काळे, डॉ. वजाहत मिर्झा, आ. कैलास गोरंट्याल, राजेंद्र राख, विजय चौधरी, महावील ढक्का, शेख शमशुद्दीन, हकीम चौधरी, राम सावंत, बदर चाऊस, रऊफ परसुवाले, दिनकर घेवंदे, संतोष माधोवाले, सय्यद अजहर, वाजेद खान, अमजद खान, आरिफ खान, शेख शकील, शेख करीम, नारायण



वाडेकर, सय्यद जमील, सय्यद अय्युब, शेख जब्बार, गुलाब खान, शेख मुस्ताक, शेख इरफान, किशोर कदम, सुभाष कांबळे आदींनी शेख खलील यांचे पक्षात स्वागत केले.

# सतीश घाटगेंचा परिवर्तन प्रचार दौरा; हायटेक प्रचाराची चर्चा
## घनसावंगी तालुक्यातील गावात सतीश घाटगेंना जनतेचा प्रतिसाद





**घनसावंगी । प्रतिनिधी** - घनसावंगी विधानसभेत अपक्ष उमेदवार सतीश घाटगे यांनी जालना तालुक्यातील काही गावानंतर दोन दिवसापासून घनसावंगीत परिवर्तन प्रचार दौरा सुरु केला आहे. रविवारी वडीरामसगाव, बाचेगाव, भायगव्हान, दहीगव्हान व एकरूखा गावात परिवर्तन यात्रा निघाली. या गावात त्यांच्या प्रचारास मोठा प्रतिसाद मिळाला. दिवसेंदिवस त्यांना सर्व घटकातील सामान्य जनतेचा पाठींबा वाढत असल्याचे दिसत आहे. सतीश घाटगे यांनी जनतेच्या आणि कार्यकर्त्यांसाठी निवडणूक लढविण्याचा निर्धार करत अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे. प्रचाराला ८ दिवसाचा कालावधी अजून बाकी आहे. सध्या राजकीय पक्षाऐवजी सर्वत्र अपक्ष उमेदवार सतीश घाटगे यांच्या हायटेक प्रचाराची चर्चा सुरु आहे.

घनसावंगी तालुक्यातील वडीराम सगाव, बाचेगाव, भायगव्हान, दहीगव्हान व एकरूखा गावात सतीश घाटगे यांचे गावकऱ्यानी जल्लोषात स्वागत केले. तसेच त्यांना एकमुखाने आपला पाठींबा दिला. खडका गावातील मुस्लीम समाजाने देखील त्यांना बहुसंख्येने पाठींबा दिला आहे. सतीश घाटगे यांनी सर्व गावातील अडचणी जाणून घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. तसेच त्यांच्या अडचणी सोडविण्याची ग्वाही दिली.

सतीश घाटगे यांच्या पत्नी वैशाली घाटगे ह्या देखील जोमाने प्रचार करत असून अंबड तालुक्यातील गावात त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या परिवारात सर्व परिवार त्यांच्यासोबत प्रचार करत आहे.



# समुद्राच्या उलट्या लाटा, खारे पाणी, जलचर जीवांचा जिद्दीने सामना केल्यानेच विश्वविक्रम झाला साकार - कु. कीर्ती भराडिया
## ३२ किलोमीटर समुद्रात पोहण्याची ऐतिहासिक विश्वविक्रमी कामगिरी करणाऱ्या जलपरीचा आयकॉन स्टील व जाधना माहेश्वरी समाजातर्फे गौरव

**जालना । प्रतिनिधी** - कुठलेही ध्येय साध्य करण्यासाठी जिद्दीला परिश्रमाची जोड देत येणारे अडथळे आणि अडचणींना एन्जॉय केल्यास अशक्य असे काहीच नाही. मी देखील खारे पाणी, लहान- मोठे जलचर जीव, उलट्या व मोठया विरुध्द प्रवाहाने लाटांचा प्रवास यासह अन्य अडचणींचा सामना करीत न डगमगता श्रीलंका (दलाईमनार) ते भारत (धनुष्यकोडी ) हे ३२ किलोमीटरचे समुद्री अंतर न थांबता १० तास २४ मिनिट पोहून पूर्ण केले आणि विश्वविक्रम रचला. भारताचे जागतिक पातळीवर नाव होईल, असे मी काहीतरी करू शकले, याचा मला सार्थ अभिमान असल्याचे आंतरराष्ट्रीय जलतरणपटू कु. कीर्ती नंदकिशोर भराडीया हिने स्पष्ट केले.

न थांबता सलग १० तास २४ मिनिटे समुद्रात पोहून श्रीलंका ते भारत हे ३२ किलोमीटरचे अंतर पोहून विश्वविक्रम रचत वर्ल्ड ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवल्याबद्दल सोलापूरची १८ वर्षीय कन्या कु. कीर्ती भराडिया व तिच्या कुटुंबीयांचा जालना माहेश्वरी समाज व आयकॉन स्टीलच्यावतीने शनिवार दि. ९ नोव्हेंबर रोजी महेश भवनमध्ये नागरी सत्कार करण्यात आला, त्यावेळी तिने रात्रीच्या काळोख्या अंधारातील या खडतर प्रवासातील वर्णन, विषद केलेले अनुभव अंगावर शहारे आणणारे होते. व्यासपीठावर कीर्तीचे वडील नंदकिशोर भराडीया, आयकॉन स्टीलचे कांतीलाल राठी, दामोदर बजाज, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. मराठी, सचिव उमेश बजाज यांची उपस्थिती होती.

### कीर्तीने जगात देशाचे नाव उंचावले - कांतीलाल राठी

श्रीलंका ते भारत हे ३२ किलोमीटरचे समुद्री अंतर न थांबता १० तास २५ मिनिटात पार करत विश्वविक्रम रचणाऱ्या कीर्तीने माहेश्वरी समाजच नव्हे भारताचे नाव जगात उंचावले आहे. या विक्रमामुळे ती भारताची जलतरणातील आयकॉन बनली असून, तिची जिद्द, कठोर परिश्रमाची तयारी आणि आत्मविश्वास पाहता ती भविष्यात अनेक कीर्तिमान प्रस्थापित करेल, असा विश्वास आयकॉन स्टीलचे संस्थापक कांतीलाल राठी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

यावेळी कीर्ती पुढे म्हणाली की, श्रीलंका ते भारत हे ३२ किलोमीटरचे समुद्री अंतर पोहून पार करणे खरे तर कठीण असे ध्येय होते. त्यासाठी मी कठोर परिश्रम घेतले. ते साध्य करण्यासाठी काळोख्या रात्री समुद्रात सहा ते सात तास सराव केला. परिवाराकडून सतत प्रोत्साहन मिळत गेले. त्यामुळे देशासाठी विश्वविक्रम रचायचाच, ही जिद्द बाळगून २० सप्टेंबर रोजी श्रीलंका (तलाईमनार) ते भारत (धनुषकोडी) हे समुद्री अंतर पोहून पूर्ण करण्यासाठी रात्री दोन वाजेच्या सुमारास काळोखात समुद्रात उडी घेतली. आजूबाजूला काळाकुट्ट अंधार, फक्त मागे निरीक्षण करणाऱ्या वर्ल्ड रेकॉर्ड अधिकाऱ्यांच्या बोटी होत्या. अधूनमधून समुद्रातील मासे आणि किडे चावा घेत होते. मात्र, त्याची सवय झालेली होती. खारे पाणी, पाण्यातील मृत जलचर जीवांच्या दुर्गंधीचा सामना करत प्रवास सुरूच होता.अरबी समुद्र व बंगालचा उपसागर असे २ समुद्र एकत्रित असल्याने लाटांच्या उलट प्रवाहांचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागला. ध्येय जवळ आल्यानंतर काहीतरी चावल्याने उजवा खांदा सुन्न पडला. मात्र दृढनिश्चय असल्याने आणि समोर ऐतिहासिक विश्वविक्रमी स्वागताची तयारी लांबूनच दृष्टीपथात येत होती. त्यामुळे थकवा दूर झाला अन सुन्न झालेला उजवा खांदा केव्हा तंदुरुस्त झाला, हेदेखील कळले नाही. शांततेने परिस्थिती हाताळली. आहे त्या परिस्थितीत हात पाय मारत दुपारी १२ वाजून १० मिनिटाला धनुश्यकोडीला पोहोचली आणि जागतिक पातळीवर देशाचा नवलौकिक करणारा हा विक्रम रचला गेला, असे तिने सांगितले. विक्रमाच्या तयारी सुरू केली तेव्हा बारावीला होते. मात्र, सरावासाठी ६ महिने सुट्टी घेतली. फक्त पुणे ते मुंबई प्रवासात मिळेल तेवढाच वेळ अभ्यास करायची. परीक्षा न देण्याचे ठरविले. मात्र, मुख्याध्यापकांनी परीक्षा न देता नापास होण्यापेक्षा परीक्षा देऊन, नापास झालेले चांगले; यातून काहीतरी शिकायला मिळेल, असा सल्ला दिला आणि त्यानुसार परीक्षा दिली आणि ८० टक्के गुण मिळाले, असे तिने सांगितले.




याप्रसंगी वडील नंदकिशोर भराडिया यांनी कीर्तीच्या सर्वसामान्य जलतरणपटू ते आंतरराष्ट्रीय जलतरणपटूपर्यंतचा प्रवास उलगडून सांगितला. या प्रवासतील प्रसंग कधी श्वास रोखायला लावणारे तर कधी उत्कंठावर्धक असे होते. पालकांनी आपल्या पाल्यांना त्यांच्यातील क्षमता विकसित करण्याची संधी द्यावी, त्याच्या आवडीच्या खेळात पारंगत करून त्याला प्रोत्साहन देत राहावे. कोणत्याही अडचणी त्याच्यातील क्षमता बाहेर काढायला येतात, त्यामुळे त्याला सामोरे जा, त्यातूनच तो घडेल असा संदेश त्यांनी दिला.

प्रास्ताविकपर भाषणात जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी म्हणाले की, पालकांनी मुलांना कशाप्रकारे प्रोत्साहन द्यावे, याचे उदाहरण कीर्ती भराडिया आहे. आपण सर्वजण समुद्राला भिणारे; पण कीर्तीने अतुलनीय साहस दाखवून ३२ किलोमीटर पोहून केलेला विश्वविक्रम अत्यंत अभिमानास्पद असून, आम्ही या साहसाला सलाम करण्यासाठीच या नागरी सत्काराचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी कीर्तीसह तिचे, आई-वडील आणि भावाचा स्मृतिचिन्ह देऊन व्यासपीठावरील मान्यवरासह शिवरतन मुंदडा, जगदीश राठी, संजय राठी, श्रीनंदन राठी, सौ. प्रफुलता राठी, सौ. किरण राठी, डॉ. भाग्यश्री राठी, उमेश राठी, प्रा.जवाहर काबरा, विनोद बियाणी, राजेंद्र मंत्री, अरुण लाहोटी, अमोल बांगड, डॉ. आशुतोष सोनी, पुसाराम मुंदडा, सतीश राठी, सुनील बियाणी, सुधीर मंत्री, लक्ष्मीनारायण मानधाना, अमोल बांगड, फुलचंद भक्कड, संतोष करवा, नंदलाल राठी, कमलकिशोर मालपाणी, दिनेश भक्कड यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी विविध संघटना व मान्यवरांच्यावतीने कीर्ती भराडीयाचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वप्निल सारडा यांनी केले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन विजय गो. राठी यांनी केले. या कार्यक्रमाला समाज बांधव, नागरिक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परतूर मतदार संघात चौफेर विकास कामे झाली - लोणीकर

## संवाद बैठका, प्रचार सभा, भेटी गाठी देत बबनराव लोणीकर यांची प्रचारात आघाडी

**मंठा । प्रतिनिधी -** परतूर मतदार संघातील गावोगाव डांबरीकरण, सिमेंट काँक्रीटीकरणाचे रस्ते झाले, सांस्कृतिक सभागृह झाले, प्रशासकीय इमारती झाल्यात, उपजिल्हा रुग्णालय झाले. प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच उपकेंद्रे झालीत, शासनाच्या विविध योजनेचा लाभ मतदार संघातील प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा पुरेपुर प्रयत्न करण्यात आल्याचे सांगतांनाच परतूर मतदार संघात चौफेर विकास कामे झाली असल्याचे प्रतिपादन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे.

प्रत्येकास अन्न आणि निवारा प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्याचे महायुती चे असून वचन वृद्ध पेन्शनधारकांना महिन्याला १५०० वरून २१०० देणार असून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर होतील २५ लाख रोजगारनिर्मिती करून १० लाख विद्यार्थ्यांनादरमहा १०,००० रुपये विद्यावेतन महायुती सरकार देईल. या बरोबर च ४५,००० गावांत पांदण रस्ते बाधणार या सह अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला १५,००० वेतन आणि विमा संरक्षण देणार असल्याचे प्रतिपादन देणार असल्याच प्रतिपादन परतूर विधानसभा मतदार संघाचे महायुती चे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

विडोळी, केदार वाकडी, केंधळी, हातवान, वाटूर तांडा, गुळखंड, धोंडीपिंपळगाव, देवगाव खवणे आणी पाडळी दुधा मंठा तालुक्यातील या गावात परतूर - मंठा - नेर - सेवली विधानसभा मतदार संघातील मंठा तालुक्यातील आकणी गावात भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), रयत क्रांती संघटना व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री मा श्री आमदार बबनराव लोणीकर साहेब यांनी जनसंपर्क दौऱ्यात प्रचारा निमित्त आयोजित बैठकीत मतदारांशी संवाद साधला यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी सदरील दौऱ्यात भाऊसाहेब गोरे, संदीप गोरे, सतीश निर्वळ, गणेश खवणे, भाऊसाहेब





कदम, राजेश मोरे, प्रसाद बोराडे, पंजाब बोराडे, प्रसाद बोराडे, नाथाभाऊ काकडे, विठ्ठलमामा काळे, अंकुशआबा कदम, नरसिंगमामा राठोड, विलास घोडके, महेश पवार आतिष राठोड, नागेश घारे, सोपानराव वायाळ, दत्तराव खराबे, दीपक दवणे, जगन टकले यांच्या सह महायुती चे नेते, पदाधिकारी, गावातील शेकडो प्रतिष्ठित नागरिक, महिला, युवक, युवती, शेतकरी, शेतमजूर मोठ्या संख्येने गावा गावात उपस्थित होते.

या वेळी पुढे बोलतांना बबनराव लोणीकर म्हणाले की परतूर मतदारसंघातील तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते प्रत्येक गावात सिमेंट काँक्रिटीकरण चे रस्ते गावोगाव सांस्कृतिक सभागृह अनेक प्रशासकीय इमारती मागासवर्गीय मुलींसाठी परतुर व मंठा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वस्तीगृह न्यायालयीन इमारती परतुर मंठा येथे भव्य क्रीडा संकुल यासह शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग आरोग्याच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र ३३ केव्ही १३२ केव्ही २२० केव्ही परतुर विधानसभा मतदारसंघात रस्त्याचा आणि विजेचे जाळ आपण निर्माण केलं असल्याचं यावेळी आमदार लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं.

परतूर तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी रु), वाटूर, आष्टी, श्रीष्टी व सातोना येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (२४ कोटी ८८ लाख) असा एकूण ८४ कोटी ८८ लक्ष रु निधी तर मंठा तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी), दहिफळ खंदारे व ढोकसाळ या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (१२ कोटी ४४ लक्ष), तर खोराड सावंगी व उस्वद प्राथमिक आरोग्य उपकेंद्रसाठी (१ कोटी १० लाख) असे एकूण ७३ कोटी ५४ लक्ष रु निधी. मतदारसंघात २ उपजिल्हा रुग्णालयासाठी १२० कोटी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३७ कोटी ३२ लाख तर २ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी १ कोटी १० लाख रुपये असा एकूण १५७ कोटी ४२ लक्ष रुपयांचा निधी आणला असल्याची माहिती दिली.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांच्या खात्यावर ७५०० जमा झाले असून परतून विधानसभा मतदारसंघातील १ लाख १० हजार पेक्षा अधिक महिलांचा यामध्ये समावेश आहे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण जयंत पाटील यासारख्या मातब्बर नेत्यांनी त्याचबरोबर काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या सर्व पक्षांनी या योजनेची खिल्ली उडवली आणि ही योजना बंद पडावी यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली व ही योजना बंद करावे अशी मागणी देखील केले त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेतलेला असताना महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ होऊन मिळू नये यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षातील सर्वांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत त्यामुळे माता भगिनी महाविकास आघाडीला नक्कीच त्यांची जागा दाखवतील असा विश्वास देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षांनी कितीही आदळ आपण केली तरी लाडकी बहीण योजना कदापि बंद होणार नाही प्रति महिना १५०० रुपयाप्रमाणे आतापर्यंत महिलांच्या खात्यात ७५०० रुपये जमा झालेले आहेत यासाठी राज्य सरकारने ४० हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली असून जो जोपर्यंत भारतीय जनता पक्ष शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे सरकार सत्तेत आहे तोपर्यंत ही योजना बंद होणार नाही अशी ग्वाही देखील यावेळी आमदार लोणीकरांनी दिली.

# बंजारा समाज मोठ्या ताकदीने आ. लोणीकरांच्या पाठीशी

### धर्मगुरू पोहरादेवी गडाचे महंत बाबुसिंग महाराज यांनी परतुर-मंठ्याचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांना दिले आशीर्वाद





**परतुर । प्रतिनिधी -** माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मंत्री व आमदार असताना बंजारा समाजातील तांडे आणि वस्त्यांवर विकासाची गंगा आणली आहे. बंजारा समाजावर लोणीकर परिवाराने प्रत्येक वेळेस भरभरून प्रेम केले आहे. यावेळी आपण त्या प्रेमाची परतफेड म्हणुन मतदारसंघातील असलेल्या बंजारा समाजाची एक गठ्ठा मतदान लोणीकर यांना द्यावे असे आवाहन बंजारा समाजाचे धर्मगुरू पोहरादेवी गडाचे महंत बाबुसिंग महाराज यांनी केले आहे.

यदलापुर येथील वरद मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या बंजारा समाजाच्या मेळाव्यात बोलताना धर्मगुरू बाबुसिंग महाराज यांनी सांगितले की, गेल्या ७५ वर्षांमध्ये पोहरागडावर एकही पंतप्रधान आले नाही. मात्र देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पोहरागडाच्या विकासासाठी करोडो रुपयाचा निधी देऊन बंजारा समाजाला न्याय दिला आहे. यामुळे भारतीय जनता पार्टीचे परतूर मंठा विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार माजीमंत्री आ. बबनराव लोणीकर यांना बंजारा समाजाने येत्या निवडणुकीत भरभरून मते देऊन प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी समाज बांधवाला केले. मंठा परतूर विधानसभेत बंजारा

समाज या कोणासोबत आहे? हे कोणत्या ज्योतिषाकडे विचारण्याची गरज नसुन आजच्या पोहरादेवी येथील महंत बाबू सिंग महाराज यांच्या मेळाव्यावरून स्पष्ट दिसून येते की, जास्तीत जास्त बंजारा समाज हा आमदार बबनराव लोणीकर यांच्याच पाठीमागे असल्याचे दिसून आले, यावेळी मतदारसंघातील बंजारा समाजाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# लॉयन्स क्लबतर्फे प्रत्येक महिन्याला ४० मोफत मोतीबिंदू नेत्र शस्त्रक्रिया



**जालना । प्रतिनिधी -** लॉयन्स क्लब ऑफ जालनाच्यावतीने मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया हा स्थायी प्रकल्प राबविला जात असून, त्या अंतर्गत महिनाभरात किमान ३५० नेत्र तपासणी आणि ४० मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत केल्या जात आहेत, अशी माहिती क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्डा यांनी दिली.

लॉयन्स क्लबतर्फे अंधत्व निवारण या प्रकल्पांतर्गत दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या रविवारी नियमितपणे शिबिराचे आयोजन केले जात आहे. या शिबिरात जिल्ह्यातील किमान ३५० रुग्ण सहभागी होऊन नेत्र तपासणी करून घेतात. मोतीबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांवर चिकलठाणा व परतूर येथील लॉयन्स नेत्रालयात मोफत शस्त्रक्रिया केल्या जातात. ज्यामुळे अनेकांना नवदृष्टी मिळत आहे. महिन्याला किमान ४० ते ४२ मोफत शस्त्रक्रिया केल्या जातात. या प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प प्रमुख डॉ. राजकुमार सचदेव, डॉ. गिरीश पाकणीकर, अरुण मित्तल, राजेश लुणिया, जयप्रकाश श्रीमाली, अतुल लड्ढा, क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा, सचिव मंजु श्रीमाली, कोषाध्यक्ष कल्पना बियाणी आणि सदस्य समर्पित भावनेने सहकार्य करून समाजात डोळ्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्यात मोठे योगदान देत आहेत.

# परतूरला मतदान यंत्राची द्वितीय सरमिसळ प्रक्रिया संपन्न



**परतूर । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने लागणाऱ्या ईव्हीएम तसेच व्हिव्हीपॅट यंत्राची द्वितीय सरमिसळ प्रक्रिया रविवारी दि.१०/११/२०२४, रोजी निवडणूक निरीक्षक श्री. नवीन, निवडणूक निर्णय अधिकारी, पद्माकर गायकवाड.सहाय्यक निवडणूक अधिकारी, डॉ. प्रतिभा गोरे.लक्ष्मीकांत खळीकर.उमेदवार प्रतिनिधी, यांच्या प्रमुख उपस्थितीत जवाहर नवोदय विद्यालयाच्या स्ट्राँग रूम कक्षात पार पडली.

निवडणूक विभागाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकानुसार ९९ परतूर विधानसभा निवडणुकीसाठी एकूण ३५९ केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. नोटासह एकूण १२ उमेदवार आहेत. निवडणूक प्रक्रियेसाठी ४३० सी.यु.(कंट्रोल युनिट), ४३० बी.यु. (बॅलेट युनिट) व ४६६ व्हिव्हीपॅट यंत्र प्राप्त झाले आहेत.

रविवारी झालेल्या द्वितीय सरमिसळ प्रक्रियेत एकूण ३५९ मतदान केंद्रासाठी प्रत्येक केंद्रावर एक संच याप्रमाणे सरमिसळ करून उमेदवार तसेच उमेदवार प्रतिनिधीना सरमिसळ प्रक्रियेची हार्ड कॉपी देण्यात आल्याचे या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.








**जालना विधानसभाच्या निवडणुकीत साठी तहसील कार्यालयात सजावट करण्यात आली आहे. काही ठिकाणी कर्मचाऱ्यांनी हिशोबनीस म्हणून ठेवण्यात आले. वेगवेगळ्या पक्षाचे वेगवेगळे टेबल ठेवण्यात आले (छायाचित्र किरण खानापुरे)**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.